# राज्यातील अधिकारी /शिक्षक/कर्मचारी यांचेसाठी इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षा

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळा (इयत्ता १ ते १२) संबंधित अधिकारी /शिक्षक/कर्मचारी यांचेसाठी विविध स्तरावर **इंग्रजी ऑलिम्पियाड परीक्षा** आयोजित करणे हा एक अभिनव व स्तुत्य उपक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे द्वारे हाती घेण्यात आलेला आहे. या उपक्रमातून अधिकारी /शिक्षक/कर्मचारी **यांचे इंग्रजी भाषा-ज्ञान, आशयज्ञान अध्यापन कौशल्ये, आणि मूल्यांकन पद्धतींचे ज्ञान** यांचा विकास होईल.

१. उद्दिष्टे:

- अधिकारी /शिक्षक/कर्मचारी यांच्या इंग्रजी भाषा विषय **ज्ञानाची चाचणी** घेणे.
- NEP २०२० नुसार त्यांची इंग्रजी **भाषिक सक्षमता आणि अध्यापन कौशल्ये** वाढवणे.
- **इंग्रजी भाषेच्या अनुषंगाने** CPD (Continuous Professional Development) ची संधी देणे.
- इंग्रजी भाषा कौशल्य विकसनासाठी **प्रोत्साहन** देणे.
- विद्यार्थ्यांसाठी अशा स्वरूपाच्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यास मदत करणे.

२. परीक्षा पातळी/स्तर:

इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचे आयोजन तालुका, विभाग आणि राज्य पातळीवर करण्यात येईल.

३.परीक्षा स्वरूप व स्तर

**एकूण प्रश्न संख्या** –१००
**स्वरूप:** MCQs
**एकूण गुण:** १००
**कालावधी:** ९० मिनिटे
**अभ्यासक्रम स्तर :** तालुका व विभागस्तरासाठी : इयत्ता पहिली ते बारावी अभ्यासक्रम
राज्यस्तरासाठी : पदवी स्तर
**नकारात्मक गुणांकन** (Negative Marking) : प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.५० इतक्या प्रमाणात मिळविलेल्या गुणांमधून वजावट केली जाईल.
सर्व स्तरासाठी निर्धारित केलेल्या वेळेतच विहित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा होतील. सदर प्रश्न पत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे तीन विभाग असतील. प्रतिसाद नोंदविताना प्रश्नपत्रिकेवरच अचूक पर्यायावर ✓ अशी खूण करावयाची आहे. एकापेक्षा अधिक पर्यायावर ✓ अशी खूण केल्यास तो प्रतिसाद ग्राह्य धरता येणार नाही.

| भाग | घटक | गुण | स्वरूप |
|---|---|---|---|
| **A** | **Grammar and Language Use** | **35** | **MCQs** |
| **B** | **Pedagogical Knowledge** | **35** | **MCQs** |
| **C** | **Comprehension** | **30** | **MCQs** |

४. अभ्यासक्रम :

A. भाषिक ज्ञान **(Grammar and Language Use)**:

- Parts of Speech
- Tenses and Verb Forms
- Articles, Prepositions
- Sentence Correction
- Vocabulary & Usage
- Synonyms/Antonyms

B. अध्यापन कौशल्ये : **(Pedagogical Knowledge)**

- Language Teaching methods
- Context of Language Education in NEP 2020 व NCF 2023.
- Inclusive and activity-based language teaching
- Use of teaching-learning materials (TLMs)
- Assessment tools - formative, rubric-based
- Simple instructions
- Classroom conversation

C. आकलंन **(Comprehension)**

- Reading  Comprehension
- Handling mixed-ability classrooms
- Dealing with errors positively

४. परीक्षा पातळ्या व वेळापत्रक :

| अ. क्र. | पातळी | आयोजन कालावधी | सहभागी | निवड |
|---|---|---|---|---|
| १. | तालुका | नोव्हेंबर: शनिवार दि.२९/११/२०२५ | केद्रातून शिक्षक/कर्मचारी व जिल्ह्यातून नजीकच्या तालुक्यासाठी अधिकारी | प्रत्येक तालुक्यातून प्रथम क्रमांक |
| २. | विभाग | डिसेंबर: चौथा शनिवार | तालुक्यातून निवडलेले उमेदवार | प्रत्येक विभागातून ५ उमेदवार |
| ३. | राज्य | जानेवारी: चौथा शनिवार | प्रत्येक विभागातून निवडलेले उमेदवार | राज्यस्तरावर प्रथम १० उमेदवार |

**टीप:** उपरोक्त प्रमाणे निवड करताना कोणत्याही टप्प्यावर जर एकापेक्षा अधिक उमेदवारांना समान गुण असतील तर खालील प्राधान्यक्रमांचा विचार करून निकाल घोषित करावा.

१. ज्या उमेदवारांचे नकारात्मक गुण कमी असतील-
२. ज्यांची मान्यताप्राप्त सेवा अधिक असेल —
३. वयाने ज्येष्ठ असतील.

५.मूल्यमापन (Assessment Criteria):

इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचे मूल्यमापन तालुकास्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर विभागस्तराचे मूल्यमापन विभागस्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर राज्य स्तरचे मूल्यमापन राज्यस्तरीय समितीद्वारे होईल. मूल्यमापन केल्यानंतरविविध समित्यानी सर्व प्रश्नपत्रिकाचे जतन करून ठेवावे. प्रत्येक टप्प्यावर समितीने केलेले मूल्यांकन अंतिम मानले जाईल.

७. आयोजनाची कार्यपद्धती (Implementation Plan):

१. **प्रश्नपत्रिका तयारी** -शिक्षणतज्ज्ञांच्या समितीमार्फत इंग्रजी भाषा विभाग, SCERT, महाराष्ट्र , पुणे
२. **नोंदणी फॉर्म वितरित** करणे (केंद्रप्रमुख )
३. **परीक्षा केंद्र निश्चित** करणे (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तालुका नोडल अधिकारी व गट शिक्षणाधिकारी
४. **मूल्यमापन समिती - तालुका, विभाग आणि राज्य**